महाराष्ट्र टाइम्स ६ एप्रिल २०११

# परदेशी वृक्षांना रोखणार 'नेटिव्ह ग्रोअर्स'

## पुण्यात उभी राहतेय स्थानिक वृक्षांच्या लागवडीची चळवळ

म. टा. प्रतिनिधी

गुलमोहोर, रेन ट्री, ऑस्ट्रलियन बाभूळ यांसारख्या परदेशी वृक्षांचे दुष्परिणाम जाणवल्याने पुण्यात सध्या स्थानिक वृक्षांच्या लागवडीची चळवळ उभी राहते आहे. त्यामुळे नागरिकांनी बंगल्यातील बागेत, सोसायटीत अथवा रस्त्याच्या दुतर्फा स्थानिक झाडे लावावीत, यासाठी रोपवाटिकांच्या प्रतिनिधींचा 'नेटिव्ह ग्रोअर्स' हा ग्रुप स्थापन झाला आहे.

शहरात देशी झाडांची संख्या वाढविण्यासाठी प्रयत्न करणे हा या ग्रुपचा मुख्य उद्देश आहे. पुण्यातील देशी, स्थानिक झाडांची रोपे करणाऱ्या नर्सरीचे प्रतिनिधी यात सहभागी झाले असून गुढीपाडव्यादिवशी या उपक्रमास सुरुवात झाली.

स्थानिक झाडे लावावीत असे तज्ज्ञांकडून वारंवार सांगितले जात असले तरी ही झाडे नक्की कोणती आहेत आणि त्यांची रोपे कुठे



मिळतात, हे सर्वसामान्यांना माहित नसते. गुलमोहर, निलगिर, रेन ट्री या झाडांची शहरातील संख्या पाहता, ती परेदशी आहेत, हे सांगूनही लोकांचा विश्वास बसत नाही. त्यामुळे त्यांना स्थानिक झाडांबद्दल मार्गदर्शन आणि रोपे उपलब्ध करून देण्याचे काम हा ग्रुप करणार आहे, अशी माहिती ग्रुपच्या समन्वयक केतकी घाटे यांनी 'मटा' शी बोलताना दिली.

सध्या ऑयकॉस, विवेक ब्रुम, कॉप्स नर्सरी, भानूदास चव्हाण, तोरणा प्लांटेशन, श्री. ढोले, अजित ठाकूर, शैलेश नर्सरीच्या प्रतिनिधींचा ग्रुपमध्ये समावेश असून इतरही वनस्पती अभ्यासक यात सहभागी होत आहेत. या ग्रुपची माहिती आणि शहरात मिळणाऱ्या झाडांची यादी तसेच उपलब्ध रोपांची संख्या याविषयीची माहिती www. oikos.in/nursery या बेवसाइटवर दिली आहे. या लिंकवर प्रत्येक नर्सरीच्या प्रतिनिधीचा पत्ता आणि संपर्क क्रमांकही देण्यात आले आहेत. निसर्ग प्रेमीही या उपक्रमात सहभागी होऊ शकतात. देशी झाडांच्या बिया गोळा करून या ग्रुपपर्यंत पोहोचवल्यास निसर्ग संवर्धनाच्या कार्यात नक्कीच मदत होईल. अधिक माहितीसाठी आयकॉस फॉर इकॉलॉजिकल सर्व्हिसेस या संस्थेशी ९८२२६५९८०४, ९८५००८९७२० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन घाटे यांनी केले.